**ग्रंथालय संचालनालय, मुंबई व संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील अस्थायी पदे दि.०१.०९.२०२५ ते २८.०२.२०२६ पर्यंत चालू ठेवणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: मराग्रं २०२४/प्र.क्र.१४४/ई-८४८४२१/ग्रं.क.**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक: २९ सप्टेंबर, २०२५

**संदर्भ :** १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मराग्रं-२०२४/प्र.क्र.१४४/ई-८४८४२१/ ग्रं.क. दि.१५.०४.२०२५.

२) शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क.,दि.२६.०८.२०२५

३) ग्रंथालय संचालक, मुंबई यांचे पत्र.क्र. १४/हंगामी अस्थायी पदे /२०२५-२६/३०४७, दि.०४.०९.२०२५.

**प्रस्तावना :**

ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयांमधील एकूण १११ अस्थायी पदे दि.०१.०३.२०२५ ते दि.३१.०८.२०२५ पर्यत पुढे चालू ठेवण्यास संदर्भाधीन क्रमांक १ येथील दि.१५.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक २ येथील दि.२६.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अस्थायी पदांना दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार सर्व प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार, ग्रंथालय संचालनालयाच्या आस्थापनेवरील कार्यरत असलेली अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याच्या अनुषंगाने या अस्थायी पदांना मुदतवाढ देण्यासाठी ग्रंथालय संचालनालयाने उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक. ३ येथील पत्राव्दारे प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार, सदर पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेली १०८ अस्थायी पदे दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ) सदर पदे ज्या प्रयोजनासाठी निर्माण केली आहेत, त्याच प्रयोजनासाठी चालू ठेवण्यात आली आहेत.

आ) ग्रंथालय संचालनालयाकडे असलेल्या विद्यमान योजनांपैकी कोणतीही योजना संपलेली नाही.

२.    यासंदर्भात होणारा खर्च खालील मुख्य लेखाशिर्षांखाली मंजूर असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा. :-

मागणी क्र. डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये,

(अ) (०१) (०१) ग्रंथालय संचालनालय (२२०५ ०२५१)

(ब) (०२) (०१) शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालये (२२०५ ०२७१)

३.    सदर शासन निर्णय हा वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पू.क, दि.२६.०८.२०२५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२५०९२९१७०३१६५८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A36B2DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D7539B1F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2025.09.29 17:04:13 +05'30'

**(अ.ता. कुंडले)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

सोबत : विवरणपत्र "अ"

प्रत :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

२. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई.

३. ग्रंथपाल गट-अ, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय पुणे/नागपूर.

४. सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक/जिल्हा ग्रंथालय अधिकारी, ग्रंथालय संचालनालय

५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

६. सर्व कोषागार/उपकोषागार अधिकारी

७. निवासी लेखाधिकारी, मुंबई

८. वित्त विभाग (अर्थसंकल्प १९), (व्यय-५) (आ.पु.क.) मंत्रालय, मुंबई

९. अवर सचिव , (अर्थसंकल्प) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. निवड नस्ती (ग्रंथालय कक्ष) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

## विवरणपत्र "अ"

( शासन निर्णय क्रः मराग्रं २०२४/प्र.क्र.१४४/ई-८४८४२१/ग्रं.क. दि. २९ सप्टेंबर, २०२५ चे सहपत्र )

| अ. क्र. | वर्ग/गट | संवर्ग/पदनाम | मंजूर पदांची संख्या | स्थायी पदांची संख्या | अस्थायी पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अस्थायी पदांची संख्या | मृत संवर्गातील रिक्त असल्याने कमी करण्यात आलेल्या पदांची संख्या | मृत संवर्गातील रिक्त असलेली पदे वजा जाता अस्थायी पदांची संख्या |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | **गट-अ राजपत्रित** | ग्रंथालय संचालक | १ | १ | ० | ० | ० |
| २ | | ग्रंथालय उपसंचालक / ग्रंथपाल वर्ग-१ | ४ | ३ | १ | ० | १ |
| ३ | **गट-ब राजपत्रित** | सहाय्यक ग्रंथालय संचालक/जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ लेखाधिकारी | ५३ | ३० | २३ | ० | २३ |
| ४ | **गट-क** | तांत्रिक सहाय्यक/ ग्रंथालय निरिक्षक / वितरण सहाय्यक/ जिल्हा ग्रंथपाल | ७४ | ४८ | २६ | ० | २६ |
| ५ | | अधिक्षक/लघुलेखक | ३ | ३ | ० | ० | ० |
| ६ | | मुख्य लिपिक | १४ | ११ | ३ | ० | ३ |
| ७ | | वरिष्ठ लिपिक | ३७ | २९ | ८ | ० | ८ |
| ८ | | निर्गम सहाय्यक | १० | ८ | २ | ० | २ |
| ९ | | कनिष्ठ लिपिक | ९१ | ६० | ३१ | ० | ३१ |
| १० | | वाहन चालक | ६ | ४ | २ | १ | १ |
| ११ | **गट-ड** | आलमारी परिचर/ग्रंथ परिचर/पृथ:कार/ नाईक/ ग्रंथवाहक/ ग्रंथ बांधणीकार | ३६ | ३० | ६ | ६ | ० |
| १२ | | शिपाई/चौकीदार/ हमाल/ माळी/सफाई कामगार | ९३ | ५७ | ३६ | २३ | १३ |
| | | **एकूण** | **४२२** | **२८४** | **१३८** | **३०** | **१०८** |

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A36B2DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D7539B1F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2025.09.29 17:04:34 +05'30'

**(अ.ता. कुंडले)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**